नि.फौ.ख.क्रं. २४५/२०२४
शासन वि. बाळासाहेब
नि.क्र. ४५/क

## सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०२ यांची शपथेवर जबानी

| | | |
|---|---|---|
| नाव | : | राजेंद्र पन्हालाल मदने |
| वय | : | ३८ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | शिराळ, ता. आष्टी जि. बीड |

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत

१. मी शिराळ येथे कुटुंबासोबत शिराळ येथे राहतो. आरोपी क्र. १ ते ६ हे भावकीतील असल्याने ओळखतो. त्यांना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी क्र. १,२ व ६ न्यायालयात हजर आहेत. नि. ४४ वरील आदेशाप्रमाणे इतर आरोपी यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. दि. ०१/१२/२०२३ रोजी औरंगाबाद येथे कोर्टात तारखेकामी भाड्याने प्रवासी घेऊन माझ्या गाडीने औरंगाबाद येथे जात होतो. आरोपी क्र. ४ आप्पा मदने माझ्यासोबत तारखेकामी आले होते. सायंकाळी सर्वजण परत आलो. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास घरासमोर असतांना आरोपी क्र. १ व २ आले व माझ्या वडीलांना औरंगाबादला का घेऊन गेलात असे म्हणाले. मी त्यांना म्हणालो, तु तुझ्या वडीलांना विचार असे सांगितले. आरोपी क्र. १ ने शिवीगाळ सुरु केली. तेथे आरोपी क्र. २ रुपाली आली. आरोपी क्र. १ ने माझ्या डोक्यात दगडाने मारले. आरोपी क्र. २ रुपालीने माझ्या पत्नीच्या डोक्यात मागच्या बाजुला दगडाने मारले. आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व लोखंडी फावड्याने फिर्यादी / माझ्या पत्नीच्या कपाळावर मारले. (अभियोगपक्षातर्फे विधीज्ञांनी कोण लोक जमा झाले, त्यांची नावे सांगा असा प्रश्न साक्षीदारास विचारला त्यावर आरोपीतर्फे विधीज्ञांनी लिडींग प्रश्न आहे असा आक्षेप नोंदवला.– आदेश– विचारलेला प्रश्न हा हो किंवा नाही या पध्दतीने उत्तरीत होत नसुन कोण लोक जमा झाले यांची नावे न घेता प्रश्न विचारण्यात आला असल्याने तो लिडींग होत नाही. सबब, आक्षेप नामंजुर.) तेथे वस्तीवरील लोक शांतीलाल मदने, विलास मदने जमा झाली त्यांनी भांडणे सोडवली.

०२. त्यानंतर मी व फिर्यादी आष्टी येथे सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे फिर्यादीच्या डोक्यात टाके घेतले व मी देखील उपचार घेतले. तेथील डॉक्टरांनी अ.नगर जाऊन सी.टी. स्कॅन करावा लागेल असे सांगितले. दि. ०३/१२/२०२३ रोजी अ.नगर येथील सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे फिर्यादीचा सि.टी. स्कॅन केला व तेथे तीन दिवस भरती होतो. दि. ०५/१२/२०२३ रोजी दवाखान्यातुन डिसचार्ज मिळाला व कडा पोलीस स्टेशन येथे नि.पी–३८/पीडब्ल्यु–१ नुसार फिर्याद दिली.

०३. आम्हाला आरोपींनी ज्या दगडाने व लोखंडी फावड्याने मारले ते पाहिल्यास मी ओळखु शकते. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३३/२०२५ वरील मुद्येमाल दाखवण्यात आला. साक्षीदाराने मुद्येमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास व लोखंडी फावड्यास अनुक्रमे **एम.ओ. १ व २** देण्यात आला आहे. पोलीसांनी घटनेबाबत चौकशी करुन जबाब नोंदवला होता.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. निंबाळकर यांच्यातर्फे उलटतपास - सुरु.**

४. माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. बाबुराव मदने आजोबा असुन त्यांना एकुण चार मुले नामे आप्पा, पन्हालाल, रावसाहेब व सोनाजी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्यामध्ये जमीनीचे वाटप झाले आहे. आप्पाला दोन मुले आरोपी क्र. १ बाळु व आरोपी क्र. ६ संजय आहेत. त्यांच्यामध्ये देखील वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ची काही जमीन आमच्या शेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/१२/२०२३ ला माझी वैयक्तिक तारीख औरंगाबादला नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ४ आप्पा मदने यांना तारखेसाठी सोबत घेऊन गेलो होतो. दि. ०१/१२/२०२३ रोजी आम्ही तारखेवरुन घरी ८.३० वाजण्याच्या सुमारास आलो. दि. ०२/१२/२०२३ रोजी आरोपी त्यांच्या घरी व आम्ही आमच्या घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, पाटासाठी संपादीत जमीन आरोपी क्र. ४ आप्पाची झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांची जमीन पाटासाठी संपादीत झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला व चुलत्यांना पाटाचे पैसे आम्हाला मिळावे असे वाटते. मी शेती व्यतिरिक्त इतर व्यवसाय करत नाही.

५. पोलीसांना जबाब देतांना, आष्टी येथे सरकारी दवाखान्यात फिर्यादीच्या / पत्नीच्या

डोक्यात टाके घेतले, शांतीलाल मदने व आप्पासाहेब मदने भांडणे सोडवण्यासाठी आले होते, फिर्यादीने/ पत्नीने सी.टी. स्कॅन केला, तीन दिवस शरीक होतो, आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व माझ्या पत्नीच्या कपाळावर मारले, भाड्याने प्रवासी घेऊन माझ्या गाडीने औरंगाबाद येथे जात होतो, अ.नगर येथील सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे फिर्यादीचा सि.टी. स्कॅन केला, हा मजकुर पोलीसांना सांगितला होता. तो मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ रुपाली हिने पुर्वी मारहाण केलेबाबत आमच्या विरुध्द केस केली होती. आरोपी क्र. ४ चा सांभाळ त्यांची मुले करतात, त्यांच्यामध्ये वाद नाहीत. आरोपी व आमच्या घरांमध्ये १००० ते १२०० फुट अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दारातुन आरोपीचे घर दिसते. आमच्या आजुबाजुला ४० लोकांची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीपेक्षा आमची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. आष्टी ते शिराळ १२ कि.मी. अंतर आहे. आमच्या घरापासुन कडा १३ कि.मी. अंतरावर असुन आष्टीकडे येण्यापेक्षा कड्यासाठी चांगला रस्ता आहे. कड्याला सरकारी दवाखाना आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास दुपारपर्यंत तहकुब.**

दि.१६.१२.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.12.17 10:55:39 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी

**दुपारनंतर उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. निंबाळकर यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

६. पंच बबन धोंडिबा श्रीराम आत्याचे दीर असल्याने नातेवाईक आहेत. पंच लक्ष्मण मदने हे भावकीतील आहेत. साक्षीदार शांतीलाल मदने हे चुलत भाऊ आहेत. साक्षीदार पन्हालाल मदने हे वडील आहेत. अमान्य की, ०३/१२/२०२३ रोजी मी घरी होतो. पोलीस स्टेशन ते सरकारी दवाखाना १ कि.मी. अंतर आहे. दवाखान्यात मी ८.०० वाजण्याच्या सुमारास आलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी तक्रार देऊ शकत होतो. दवाखान्यातुन अ.नगर येथे गेलो, घरी गेलो नाही. माझ्याकडे २ चाकी व ४ चाकी वाहन आहे. अमान्य की, पोलीस स्टेशनला ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजता मारहाण केलेबाबत आमच्याविरुध्द केस केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या केसला शह देण्यासाठी ही केस

केली. घरापासुन २ ते ३ कि.मी. अंतरावर आमची सर्व शेती आहे. आमच्याकडे ४–५ जनावरे आहेत. जनावरांचे शेण काढणेकामी फावडे पडलेले असते.

७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आमच्याविरुध्द अदखलपात्र गुन्हा ५२६/२०२४ दि. २५/०७/२०२४ रोजी दाखल केला होता. तसेच अदखलपात्र गुन्हा ४६३/२०२४ दाखल असलेबाबत सांगता येत नाही. अमान्य की, पोलीस स्टेशनला ओळख असल्याने पोलीस आमच्याविरुध्द कार्यवाही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत किरकोळ वाद नाही. दि. ०५/१२/२०२३ रोजी ५.०० वाजण्याच्या सुमारास कडा पोलीस चौकी येथे तक्रार देण्यासाठी गेलो. अमान्य की, पोलीस स्टेशनला तक्रार देण्यापुर्वी फिर्यादी व माझ्या आई वडीलांसोबत चर्चा झाली. मी व फिर्यादी मोबाईल वापरतो. पोलीस पाटलांना घटनेबाबत फोनवरुन कळवले नाही. अमान्य की, आरोपी क्र. ४ आप्पा मदने सोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना तक्रार दिली त्याची संपुर्ण माहिती मी सांगितली. अमान्य की, पाटात गेलेल्या जमीनीचे पैसे मिळावेत म्हणुन आरोपींना त्रास देतो.

८. दगड ओबडधोबड असतो व गोटा गोल असतो याबाबत मला सांगता येत नाही. अमान्य की, मुद्देमाल दगड गोल आहे. अमान्य की, सरतपासातील नमुद मजकुर खोटा सांगितला आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण- फेरतपास नाही.**

दि.१६.१२.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.12.17 10:55:46 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी

**नि.फौ.ख.क्रं. २४५/२०२४**

**शासन वि. बाळासाहेब**

**नि.क्र. ४६/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०३ यांची शपथेवर जबानी</u>**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | शांतीलाल सोनाजी मदने |
| वय | : | २८ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | शिराळ, ता. आष्टी जि. बीड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत</u>**

१. मी शिराळ येथे कुटुंबासोबत मदने वस्ती येथे राहतो. आरोपी क्र. १ ते ६ हे भावकीतील असल्याने ओळखतो. त्यांना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी क्र. १, २ व ६ न्यायालयात हजर आहेत. नि. ४४ वरील आदेशाप्रमाणे इतर आरोपी यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. फिर्यादी वंदना व आमच्या घरामध्ये ४०० फुट अंतर आहे. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० ते ७.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ व २ हे अ.सा.क्र. १ व २ यांना शिवीगाळ करत होते. मी माझ्या घरी होतो. आवाज ऐकल्यावर मी भांडणे सोडविण्यासाठी गेलो. आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व तिचा पती राजेंद्र मदने यास दगडाने फिर्यादीच्या घरापुढे मारहाण केली. भांडणामध्ये फिर्यादीच्या कपाळावर व तिचा पती राजेंद्र याच्या डोक्याच्या मागच्या बाजुला जखमी झाली. मी भांडणे सोडवल्यानंतर आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व लोखंडी फावड्याने फिर्यादीस डोक्यावर मारले. आरोपी क्र. ४ ते ६ यांनी फिर्यादीस व तिच्या पतीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पती राजेंद्रने फिर्यादीस आष्टी येथे सरकारी दवाखान्यात नेले. त्यानंतर अ.नगर येथील सरकारी दवाखान्यात नेले. तेथे फिर्यादीने कडा पोलीस स्टेशन येथे नि.पी–३८/पीडब्ल्यु–१ नुसार फिर्याद दिली.

०२. जाधव पोलीसांनी घटनेबाबत चौकशी केली. जबाब नोंदवला नाही. आरोपींनी ज्या दगडाने व लोखंडी फावड्याने फिर्यादीस व तिच्या पतीस मारले ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३३/२०२५ वरील मुद्येमाल दाखवण्यात आला. साक्षीदाराने मुद्येमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास व लोखंडी फावड्यास अनुक्रमे **एम.ओ. १ व २** देण्यात आला आहे. भांडणे सोडवण्यासाठी माझा भाऊ विलास मदने हजर होता.

**सरतपास पुर्ण**
**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस. निंबाळकर यांच्यातर्फे उलटतपास - सुरु.**

३. माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले. मी फिर्यादी व आरोपींच्या कुटुंबीयांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने यापुर्वी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांवर केस केली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्या जमीनी व व्यवहार वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ४ आप्पा यांची पाटामध्ये जमीन गेल्याने औरंगाबाद खंडपीठात केस प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, अ.सा.क्र. २ राजेंद्र याची जमीन पाटामध्ये गेली नसल्याने त्याबाबत केस नाही. फिर्यादी व तिच्या पतीस पाटातील जमीनीबाबत मोबदला मिळावा असे वाटते किंवा कसे याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजता भांडणे झाल्याच्या कारणावरुन आरोपी क्र. २ ने आमच्याविरुध्द केस केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी फिर्यादी व तिचे कुटुंबीय आरोपींना मारहाण करत असतांना मी हजर होतो. फिर्यादीने दि. ०५/१२/२०२३ रोजी फिर्याद दिल्याचे सांगितले. मला प्रत्यक्ष माहिती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडल्यानंतर तेथे गेलो व सर्वांना आपआपल्या घरी पाठवले. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी कडा व अ.नगर येथे गेलेबाबत प्रत्यक्ष माहिती नाही. फिर्यादीने त्याबाबत सांगितले. आरोपींनी फिर्यादीविरुध्द त्रास देऊ नये म्हणुन केसेस केल्याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या केसला मदत व्हावी म्हणुन साक्षकामी आलो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ रुपाली हिने केलेल्या केस मध्ये मी आरोपी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या केसमध्ये आरोपी असल्याने सदर केसमध्ये फिर्यादीच्या बाजुने साक्ष देत आहे. अमान्य की, आरोपींनी केलेल्या केसला शह देण्यासाठी सदरची केस केली. फिर्यादीच्या घरासमोर गुरांचा गोठा आहे. तेथे शेण काढण्यासाठी फावडे पडलेले असते. तसेच दगड माती देखील पडलेली असते. दगड ओबडधोबड असतो व गोटा गोल असतो याबाबत मला माहित नाही. अमान्य की, फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे सरतपास नोंदवला. माझे आष्टीला जाणे–येणे नसते. कामानिमित्त आष्टीला येतो. अमान्य की, आरोपीची फिर्यादीपेक्षा आर्थिक परिस्थिती चांगली आहे. अमान्य की, सरतपासातील नमुद मजकुर खोटा सांगितला आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.
**उलटतपास पुर्ण- फेरतपास नाही.**

दि.१६.१२.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.12.17 10:55:57 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी